दिनविशेष
२६ एप्रिल
अंतरराष्ट्रीय
१९६१ – सियेरा लिओनला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९७८ – अफगाणिस्थानात लष्करी क्रांती.
राष्ट्रीय
१९५१ – सोमनाथ मंदिर सर्वांसाठी खुले करण्यात आले.
१९६२ – लोकल बोर्डाच्या जागी जिल्हा परिषदांची स्थापना.
जन्म
१८२२ – युलिसिस एस. ग्रँट, अमेरिकेचा १८वा राष्ट्राध्यक्षाचा जन्म.

निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....

# दैनिक निशस्त्र योध्दा

मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com

मेहकर | सोमवार । २७ एप्रिल २०२६ । वर्ष–पहिले । अंक क्र. ४० । पृष्ठे–४ । किंमत–४ रु. बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द

## Short न्यूज

### बागेश्वर बाबाचे शिवरायांबद्दल वादग्रस्त वक्तव्य, संभाजीराजे संतापले

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज लढून थकले होते, त्यामुळे त्यांनी समर्थ रामदासांकडे जाऊन राजपाट सांभाळण्याची विनंती केली, असे वादग्रस्त वक्तव्य बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी केले. त्यांच्या वक्तव्यावर जनतेमधून तीव्र प्रतिक्रिया येत असताना माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी धीरेंद्र शास्त्री यांना महाराष्ट्रात येण्यास बंदी घालण्याची मागणी केली आहे. नागपूरमध्ये एका आयोजित कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्री यांनी छत्रपती शिवरायांबद्दल अकलेचे तारे तोडले. छत्रपती शिवराय लढून थकले. अखेर त्यांनी समर्थ रामदास यांना राजपाट सांभाळण्याची विनंती केली, असे धीरेंद्र शास्त्री म्हणाले. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत त्यांनी शिवरायांवर वादग्रस्त वक्तव्य केले. त्यांच्या विधानाने राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. याच पार्श्वभूमीवर माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी धीरेंद्र शास्त्री महाराज यांचे कार्यक्रम महाराष्ट्रात होऊ न देण्याची विनंती राज्य शासनाकडे केली आहे.

### मीरा रोडमध्ये २३.३ लाख रुपयांचे ड्रग्स जप्त, तिघांना अटक

मीरा रोड : मुंबईलगतच्या मीरा–भाईंदर शहरात पोलिसांनी गेल्या दोन दिवसांत वेगवेगळ्या कारवाईत एकूण तेवीस लाख तीस हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणांमध्ये तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. मीरा–भाईंदर पोलिसांच्या अँटी–नारकोटिक्स सेलचे पोलिस निरीक्षक समीर शेख यांनी रविवारी सांगितले की, त्यांची टीम शहरातील विविध भागांत गेल्या दोन दिवसांपासून अमली पदार्थाविरुद्ध कारवाई करत आहे. त्याअंतर्गत २४ एप्रिल रोजी मध्यरात्री सुमारे पाऊण वाजता पोलिसांनी मीरा रोड येथील वेस्टर्न हॉटेलजवळ टियारा हिल्स सोसायटी परिसरात सापळा रचून दोन संशयितांना अटक केली. त्यापैकी एक अरशद अली हुसेन अली नकवी (३८) याच्याकडून ५९ ग्रॅम मेफेड्रोन हा अमली पदार्थ जप्त करण्यात आला, ज्याची किंमत ११ लाख ८० हजार रुपये होती. तर त्याचा साथीदार हुसेन अली फिरोज अली बादामी (३१) याच्याकडून ४१.९ ग्रॅम मेफेड्रोन मिळाले, ज्याची किंमत आठ लाख ३८ हजार रुपये होती. या कारवाईदरम्यान गुन्ह्यासाठी वापरलेली एक मोटारसायकलही जप्त करण्यात आली आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांवरील लिखाणाचे फिल्टरिंग आवश्यक; चंद्रशेखर बावनकुळेंची प्रतिक्रिया

**शिर्डी :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त सहपरिवार साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं. दर्शनानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील वादग्रस्त लिखाणाबाबत आपली स्पष्ट भूमिका मांडली. ''लोकप्रतिनिधी असो किंवा कोणीही असो, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बोलताना विचारपूर्वकच बोललं पाहिजे,'' अशी ठाम भूमिका बावनकुळे यांनी गोविंद पानसरे यांनी लिहिलेल्या पुस्तकासंदर्भात निर्माण झालेल्या वादावर बोलताना व्यक्त केली.
छत्रपती शिवाजी महाराजांवरील लिखाणाचं फिल्टरिंग आवश्यक : छ. शिवाजी महाराजांबद्दल मुद्रित माध्यमांतील लिखाणाचे फिल्टरिंग करण्याची गरज असल्याचंही मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नमूद केलं. विविध इतिहासकारांनी वेगवेगळ्या पद्धतीने इतिहास मांडल्यामुळं काही वेळा चुकीची किंवा अपूर्ण माहिती समाजासमोर येते, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

# अपात्र लाडक्या बहिणींवर कारवाईचा बडगा

## आतापर्यंत ११ कोटींची वसुली; लाभार्थीत सरकारी कर्मचाऱ्यांचाही समावेश

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**मुंबई :** अपात्र असूनही अनुदान लाटणार्या लाडक्या बहिणींवर सरकारने कारवाईचा बडगा उगारला असून अपात्र लाभार्थींकडून महिला आणि बालकल्याण विभागाने ११ कोटी रुपयांची वसुली केली आहे. त्यामुळे बनवेगिरी केलेल्या लाभार्थी महिलांचे धाबे दणाणले आहे.
विशेष म्हणजे या योजनेचा फायदा काही सरकारी कर्मचार्यांनीही लाटल्याचे समोर आले आहे. त्यांच्याकडूनही सरकारने पैशांची वसुली सुरू केली आहे. राज्यातील १२ हजार ९१५ लाभार्थी हे अपात्र आढळून आले आहेत. त्यापैकी ६ हजार ४५७ महिलांकडून आतापर्यंत ११ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. यामुळे एकच खळबळ उडाली.
अपात्र ठरणार्या लाडक्या बहिणींची छाननी सुरूच आहे. आणखी काही लाभार्थींना या छाननीतून धक्का बसण्याची शक्यता आहे.
लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांना राज्य सरकारकडून दरमहा १५०० रुपये अनुदान दिले जाते. या योजनेचा मोठा फायदा महायुतीला झाला. महायुती सरकारला महिलांनी भरभरून मतदान करत पुन्हा सत्तेत आणले. दरम्यान, लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्यासाठी काही नियम आणि अटी सरकारने लागू केल्या होत्या. मात्र, अपात्र असलेल्या महिलांनीही या



योजनेसाठी अर्ज केले. त्यामुळे सरकारने केवायसी करण्याचे आदेश काढले. आता लाडकी बहीण योजनेबद्दल धक्कादायक माहिती पुढे येत आहे. केवायसीमधून हजारो लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत. त्यांच्याकडून वसुली सुरू आहे.
महिला व बालकल्याण सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांनी यासंदर्भातील ग्रामविकास विभागाकडून अहवाल मागवला होता. त्यानुसार, ही कारवाई केली जात आहे. लाडकी बहीण योजनेत महत्त्वाची अट होती की,

### वार्षिक खर्च ४३ हजार कोटी

लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडत आहे. त्याचा परिणाम म्हणून विविध विभागांच्या निधीला कात्री लागली आहे. या योजनेवर वर्षाला ४३ हजार कोटींपेक्षा जास्त खर्च झाला आहे. अनेक अपात्र लाडक्या बहिणींनी लाभ घेतल्याचा समोर आल्यानंतर राज्य सरकारने चाळणी लावायला सुरुवात केली आहे. कागदपत्रांची तपासणी केली जात असून, अपात्र लाभार्थ्यांकडून वसुलीची मोहीम सुरूच राहणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या योजनेसाठी सरकारी कर्मचारी महिला अर्ज करू शकत नाही. मात्र सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेसाठी अर्ज केला होता.

## धक्कादायक! पुरंदरमध्ये बायोगॅसची टाकी स्वच्छ करण्यासाठी गेलेल्या तिघांचा मृत्यू

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील बेलसर येथे धक्कादायक घटना घडली आहे. बायोगॅसची टाकी स्वच्छ करण्यासाठी गेलेल्या तिघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. आज दुपारी साधारण तीनच्या सुमारास ही घटना उघडकीस आली आहे. मृत्यू झालेले तिघेही कामगार हे बिहार मधील मधील असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. बेलसर येथील एका मशरूम कंपनीमध्ये कामगार काम करत होते. बेलसर येथील एका मशरूम कंपनीमध्ये हे तीनही कामगार काम करत होते. घटनेनंतर जेजुरी पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले असून तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. या घटनेनंतर परिसरात खळबळ माजली आहे. हे तिघेही कामगार बायोगॅसची टाकी स्वच्छ करण्यासाठी गेले होते, यावेळी त्यांचा मृत्यू झाला आहे. हा घटनेमुळं हळहळ व्यक्त केली जात आहे.
धाराशिव जिल्ह्यातील मलकापूरमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. मलकापूरच्या दत्त देवस्थान इथं दुर्दैवी घटना घडली आहे. एकनाथ लोमटे महाराज यांच्या संस्थेत किर्तनासाठी आलेल्या १५ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू झाला आहे. पाण्यात पोहण्यासाठी गेलेल्या रुद्र धुमाळ या वारकरी मुलाचा मृत्यू झाला आहे.
मुले बाजूच्या मठा शेजारील तळ्यात पोहण्यासाठी गेली होती त्यावेळी घडली घटना मिळालेल्या माहितीनुसार, लोमटे महाराजाच्या मलकापूर येथील मठात सप्तहाचे आयोजन केले होते. सप्तहास तेर येथील वारकरी शिक्षण संस्थेतील मुलं कीर्तन कार्यक्रमासाठी आली होती.
५ मुले बाजूच्या मठा शेजारील तळ्यात पोहण्यासाठी गेली होती. त्यातील एका मुलाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. रेस्क्यू टीमने बुडालेल्या मुलाचा मृतदेह बाहेर काढला आहे. एवढी मुले जर मलकापूर मठात आली होती तर त्यांची काळजी या मठातील सदस्यांनी का घेतली नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मलकापूर येथील स्वयंघोषित राष्ट्रसंत म्हणून लोमटे महाराज कायम वादात राहिले आहेत.

## सूर्य आग ओकतोय! अकोल्यात उष्णतेची लाट; पारा ४६.९ अंशावर

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

अकोला : अकोल्यात उष्णतेची लाट आली असून अकोल्याचं तापमान ४६.९ अंश सेल्सिअसच्यावर गेलं आहे. विदर्भात गेल्या काही दिवसापासून तापमानाचा पारा चढता असून देशात उष्णतेचा सर्वाधिक फटका अकोला शहराला बसत आहे. शनिवारी (२५ एप्रिल) अकोल्याचं तापमान ४५.६ एवढं नोंदवण्यात आलं.
आज अकोल्याचं किमान तापमान २७.५ तर कमाल तापमान ४६.९ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आल्याची माहिती, भारत हवामान शास्त्र विभागाचे सहाय्यक वैज्ञानिक शुभम धुळेकर यांनी दिली. तर विदर्भात नव्हे तर राज्यात हे तापमान सर्वात जास्त असल्याचं बोलल्या जात आहे.
राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.
अनेक जिल्ह्यात तापमान ४० अंशावर आहे. त्यामुळं नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः विदर्भात उष्णतेची लाट आहे. अकोल्याचं तापमान आज ४६.९ इतकं नोंदवण्यात आलं आहे.
तापमानाचा पारा ४६.९ अंशावर गेल्यानं अकोल्यात सकाळपासूनच उष्णतेची काहिली नागरिकांना त्रासदायक ठरली. उष्णतेच्या प्रचंड प्रखरतेनं नागरिकांसह पशुपक्ष्यांचेही हाल झाल्याचं चित्र अनेक ठिकाणी बघायला मिळालं. दुपारी बारानंतर अनेक भागातील रस्ते निर्मनुष्य झाले होते. अकोल्यात विक्रमी तापमानाची नोंद दिवसेंदिवस होत आहे.

## माझ्या वक्तव्याचा विपर्यास झाला, महाराजांचा अवमान करण्याचा प्रश्नच नाही धीरेंद्र शास्त्री यांनी मागितली माफी

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**नागपूर :** बागेश्वर बाबा यांनी नागपुरात एका कार्यक्रमात बोलत असताना छत्रपती शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास सांगत घोर अवमान केल्याचा आरोप राजकीय व सामाजिक संघटनांनी केला होता. याबाबत रविवारी स्वतः धीरेंद्र शास्त्री बागेश्वर बाबा यांनी पत्रकार परिषद घेत जाहीर माफी मागितली. ''माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेलाय. छत्रपती शिवाजी महाराज यांना मानणारा मी आहे. त्यामुळं स्वप्नात देखील महाराजांचा अवमान मी करू शकत नाही,'' असं धीरेंद्र शास्त्री म्हणाले.
चार मूल जन्माला घालणे म्हणजे... : पाच दिवसीय रामकथा नागपुरात सुरु झाली आहे. हिंदुत्व जागृत करण्यासाठीही आवाहन करणार असल्याचं शास्त्री म्हणाले. पुढे मी देखील गृहस्थ जीवनात जाणार आहे. चार मूल जन्माला घालून त्यापैकी एक संघाला समर्पित या वाक्याचा अर्थ म्हणजे ''एक सैन्याला द्या, शिक्षक बनवा, राष्ट्रप्रेमी बनवा'' असा असल्याचं स्पष्टीकरण त्यांनी दिलं.
''मी परवा आरएसएसच्या एका कार्यक्रमात गेलो होतो, त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात बोललो. काहींनी माझ्या वक्तव्याला वेगळ्या पद्धतीनं प्रस्तुत केलं. मला दोषारूप केलं की महाराजांचा चुकीचा इतिहास सांगत त्यांचा अवमान केला. हिंदू राष्ट्राची ज्यांची संकल्पना आहे, त्यांच्याविरुद्ध स्वप्नातही ऐकू शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना मी देखील मानतो. जर आम्ही आपसातच असे केले तर दुसऱ्यांना त्याचा फायदा मिळेल. माझ्या वक्तव्यासंदर्भात दिलगिरी व्यक्त



करतो, त्यांचा अपमान मी कसा करू शकतो?'' – धीरेंद्र शास्त्री, बागेश्वर बाबा
लव जिहादविरोधात कठोर कायदा बनवा : ''देशात आणि मुंबई, नागपूर, महाराष्ट्रात लव जिहादचे प्रकरणं वाढत आहेत. प्रेम करणं गुन्हा नाही. मात्र, आपली संस्कृतीचे हनन हे चुकीचे आहे. मुलींना जागृत करणार,'' असं बागेश्वर बाबा म्हणाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री याप्रकरणी चांगले काम करत आहेत. लव जिहादविरोधात कठोर कायदा बनवा. इन्स्टा, फेसबुकवर हिंदू मुलींना फसवतात. लव जिहाद मुक्त भारत, महाराष्ट्र व्हावा, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.
''मी कुणाचाही अपमान केला नाही, धर्मांतरणचा रथ रोखयाचा प्रयत्न हे काही लोक करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या गुरुप्रति किती समर्पित होते हेच मी सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांची महिमा वाढावी हीच माझी भावना होती. त्यांची अवमान करण्याची कुठलीही भावना नव्हती, संतांचे विचार मी सांगितले,'' असं धीरेंद्र शास्त्री म्हणाले.

## लोणेरे तरुणी हत्याकांड; आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी


दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**रायगड :** जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील लोणेरे येथे घडलेल्या तरुणीच्या निर्घृण हत्याकांड प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अनिस मोहम्मद खान मालदार याला अलिबाग जिल्हा सत्र न्यायालयाने ३० एप्रिलपर्यंत ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.
सहा दिवस पोलिसांना चकवा देणारा आरोपी अखेर ठाणे परिसरातून जेरबंद करण्यात आला. या घटनेमुळे संपूर्ण रायगड जिल्हा हादरला असून परिसरात संतापाची लाट उसळली आहे. रायगडमधील लोणेरे येथील लॉजमध्ये २२ वर्षीय तरुणीचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आल्याने सुरुवातीला खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच गोरेगाव पोलीसांसह फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले होते. मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम आणि तपास सुरू असताना ही घटना हत्येची असल्याचे स्पष्ट झाले.
तपासादरम्यान समोर आलेल्या धक्कादायक माहितीनुसार, आरोपी अनिस मोहम्मदखान मालदार याने तरुणीला लोणेरे येथील लॉजवर नेले. तिथे आधी तिच्यावर बलात्कार केला आणि त्यानंतर धारदार शस्त्राने तिचा निर्घृण खून केला. गुन्हा केल्यानंतर आरोपी फरार झाला होता. या प्रकरणाचा तपास वेगाने करत स्थानिक गुन्हे शाखा, गोरेगाव पोलीस आणि इतर पथकांनी मिळून आठ ते दहा टीम तयार करून आरोपीचा शोध सुरू केला होता. तब्बल सहा दिवसांच्या शोध मोहिमेनंतर काल रात्री ठाणे परिसरातून आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले.

## राज्य सरकारकडून इतिहासकार गजानन मेहेंदळे स्मृती पुरस्काराची घोषणा

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**मुंबई :** मराठा इतिहास संशोधन क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे प्रख्यात इतिहासकार दिवंगत गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्य सरकारने पुरस्काराची घोषणा केली आहे. मराठेकालीन इतिहास संशोधन, लिखाणासाठी दरवर्षी हा पुरस्कार दिला जाणार असून एक लाख रुपये रोख आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असणार आहे.
राज्याच्या सांस्कृतिक कार्यविभागाने 'स्व. गजानन भास्कर मेहेंदळे स्मृती पुरस्कार' देण्यास मान्यता दिली आहे.




सांस्कृतिक कार्य विभागामार्फत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मेहेंदळे यांनी मोडी, फारसी, उर्दू आणि पोर्तुगीज या भाषांमध्ये प्रावीण्य मिळवून ऐतिहासिक दस्तऐवजांचा सखोल अभ्यास केला. त्यांनी पाच दशकांहून अधिक काळ शिवचरित्र, मराठा युद्धनीतीचा इतिहास, युद्धशास्त्र आणि मध्ययुगीन भारतीय इतिहास या विषयांवर संशोधन व लेखन केले.
त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी मराठाकालीन इतिहास संशोधनात कार्यरत संशोधक, इतिहासकार, विद्वान आणि लेखकांना प्रोत्स–ाहन देण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीची स्थापन करण्यात आली आहे.

## अभ्यासक्रमातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळल्यानं राजमाता कल्पनाराजे संतापल्या

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**सातारा :** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं अभ्यासक्रमातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळल्यानं राजमाता कल्पनाराजे भोसले संतापल्या आहेत. त्या म्हणाल्या की, ''ही धोक्याची घंटा आहे. आज नकाशा पुसला, कालांतरानं छत्रपती शिवाजी महाराजांवर पडदा पडू शकतो. हे चालणार नाही. तोच प्रयत्न सुरू आहे, असं मला वाटते. परंतु, जोपर्यंत चंद्र, सुर्य, तारे आहेत, तोपर्यंत या देशातील प्रत्येकाच्या हृदयात छत्रपती शिवाजी महाराज असतील,'' असंही त्यांनी ठणकावलं.
इयत्ता आठवीच्या अभ्यासक्रमातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा वगळल्याबद्दल राजघराण्यातून मोठा उठाव झाला आहे. श्री. छ. वृषालीराजे भोसले यांनी नुकताच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. तसेच तो नकाशा पुन्हा पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यासाठी केंद्र सरकारला पंधरा दिवसांचा अल्टीमेटम दिला आहे. या पार्श्वभूमीवर राजमाता कल्पनाराजे भोसले माध्यमांशी बोलताना म्हणाल्या की, ''मराठा साम्राज्याचा नकाशा वगळणं हे प्रकरण गंभीर आहे. ही धोक्याची घंटा आहे. हे जर असेच चालत राहिले तर कालांतरानं छत्रपती शिवाजी महाराजांवर देखील पडदा पडू शकतो.''
चंद्र, सुर्य, तारे आहेत तोपर्यंत . ''सध्या जे काही सुरू आहे, ते चालणार नाही. पृथ्वीतलावर चंद्र, सुर्य, तारे आहेत, तोपर्यंत या देशातील प्रत्येकांच्या हृदयात, नसानसात छत्रपती शिवाजी महाराज असतील. महाराष्ट्राचा नकाशा इतिहासाच्या पुस्तकातून पुसला जातो.



उद्या छत्रपती शिवाजी महाराजांवर देखील पडदा पडू शकतो. मग फक्त आम्हीच महाराष्ट्रात आहोत का? तुम्ही पण हिस्सा आहात ना? मग तुमचा आवाज कुठे गेला,'' असा सवालही राजमाता कल्पनाराजेंनी महाराष्ट्रवासियांना केला.
छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट तेरावे वंशज खासदार उदयनराजे भोसले आणि मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या चुलत भगिनी वृषालीराजे भोसले यांनी शुक्रवारी साताऱ्यात जोरदार आंदोलन केलं.

## संभाव्य दुष्काळामुळे कस लागणार!

हवामानातील अनिश्चितता आणि पावसाचा कमी अंदाज पाहता राज्यात धोका तसाच कायम आहे. सध्याचा साठा टिकवून ठेवण्यासाठी काटकसरीने पाण्याचा वापर करणे अत्यावश्यक आहे, अन्यथा काही महिन्यांतच परिस्थिती २०१४-१५ सारखी होऊ शकते. राज्यात संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत. हवामान विभागाने एल निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमी, सुमारे ९२ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केल्यानंतर २० एप्रिल २०२६ रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उच्चस्तरीय बैठक घेऊन जलसंधारण, पाणी व्यवस्थापन आणि पशुखाद्य नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण निर्देश दिले. जलयुक्त उपक्रम, गाळ काढणे, शेततळे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि चारा विकास यांसारख्या उपाययोजना तातडीने राबवण्याचे आदेश देण्यात आले. हे चित्र सक्रिय आणि सजग प्रशासनाचे वाटते; मात्र या सूचनांची अंमलबजावणी वेळेत होईल का ही शंकाच आहे. २०१४ आणि २०१५ सालचा अनुभव सरकारी धोरणाच्या विपरीत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार महाराष्ट्रात विशेषतः मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि काही पश्चिम भागात पावसाची कमतरता जाणवण्याची शक्यता आहे. विदर्भात काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो, पण एकूणच अनिश्चितता कायम आहे. देशातील मोठे शेतीक्षेत्र पावसावर अवलंबून असल्याने या स्थितीचा थेट परिणाम उत्पादन, पिकांची सुरक्षा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणार आहे. जलसंपदा विभागाच्या आकडेवारीनुसार एप्रिल २०२६ अखेर राज्यातील धरणांमध्ये सुमारे ६५० टीएमसीपेक्षा अधिक पाणीसाठा उपलब्ध आहे. वरकरणी हा साठा समाधानकारक वाटतो; मात्र विभागनिहाय चित्र वेगळे दिसते. कोकण आणि काही पश्चिम भागात तुलनेने चांगला साठा असला, तरी मराठवाडा आणि भीमा खोऱ्यातील धरणांमध्ये वापरण्यायोग्य पाणी मर्यादित आहे. उजनीसारख्या धरणांमध्ये एकूण साठा दिसत असला, तरी प्रत्यक्ष सिंचनासाठी उपलब्ध पाणी कमी असल्याने निर्बंध आणावे लागत आहेत. उत्तर महाराष्ट्रातील काही शहरांना ऑगस्टपर्यंत पुरेल एवढाच साठा असल्याचे संकेत आहेत, तर काही ठिकाणी आधीच पाणी कपातीचे नियोजन सुरु झाले आहे.

या पार्श्वभूमीवर २०१४ आणि २०१५ च्या परिस्थितीकडे पाहणे महत्त्वाचे ठरते. त्या काळातही एल निनोमुळे मान्सून कमकुवत झाला होता. २०१४ मध्ये राज्यातील अनेक धरणांतील पाणीसाठा लक्षणीयरीत्या घटला आणि २०१५ पर्यंत परिस्थिती अधिकच बिकट झाली. मराठवाड्यातील काही धरणे जवळपास कोरडी पडली होती. लातूरसारख्या शहरांना पाणीपुरवठ्यासाठी रेल्वेने टँकरद्वारे पाणी आणण्याची वेळ आली होती. भीमा आणि गोदावरी खोऱ्यातील पाणीसाठे झपाट्याने कमी झाले होते. अनेक तालुक्यांमध्ये टँकरवर अवलंबून राहावे लागले आणि शेती मोठ्या प्रमाणावर कोरडी पडली. त्या अनुभवातून जलसंधारणावर भर देण्याची गरज अधोरेखित झाली होती. आजची परिस्थिती त्या तुलनेत थोडी सुधारलेली वाटत असली, तरी हवामानातील अनिश्चितता आणि पावसाचा कमी अंदाज पाहता धोका तसाच कायम आहे. सध्याचा साठा टिकवून ठेवण्यासाठी काटकसरीने वापर करणे अत्यावश्यक आहे, अन्यथा काही महिन्यांतच परिस्थिती २०१४-१५ सारखी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सरकारने दिलेल्या सूचनांमध्ये चारा विकास कार्यक्रमालाही प्राधान्य देण्यात आले आहे. मात्र या योजनेच्या अंमलबजावणीला वेळ लागतो. चारा पिकांना कापणीसाठी किमान ४५ ते ७० दिवस लागतात. त्यामुळे ही योजना तातडीच्या उन्हाळी टंचाईवर उपाय म्हणून उपयोगी पडणार नाही, तर पुढील हंगामासाठीच अधिक उपयुक्त ठरेल. शेततळे आणि जलसंधारणाच्या कामांबाबतही अशीच स्थिती आहे. यंत्रसामग्री वापरल्यास कामे जलद पूर्ण होऊ शकतात; मात्र रोजगार हमीच्या अटींमुळे अनेक ठिकाणी कामांचा वेग कमी राहतो. मानवी श्रमांवर अवलंबून राहिल्यास कामे पूर्ण होण्यासाठी काही महिने लागू शकतात. निधीचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे राबवण्यासाठी आर्थिक तरतूद आवश्यक आहे. राज्याच्या तिजोरीवर आधीच ताण असल्याने निधीची उपलब्धता आणि वेळेवर वितरण हे मोठे आव्हान ठरणार आहे. रोजगार हमी निधीचा वापर करण्याचे निर्देश दिले असले, तरी त्याच्या प्रत्यक्ष उपलब्धतेबाबत स्पष्टता आवश्यक आहे. एकूण परिस्थितीचा विचार करता, सरकारची दिशा योग्य असली तरी वेळ आणि अंमलबजावणी हीच खरी कसोटी आहे. २०१४-१५ च्या अनुभवाने दाखवून दिले आहे की, पाण्याचे नियोजन वेळेत न केल्यास परिस्थिती झपाट्याने बिघडू शकते. त्यामुळे केवळ बैठका आणि घोषणा न करता, स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्र्यांचे निर्देश हे आवश्यक आणि योग्य असले, तरी निधीची उपलब्धता आणि विभागनिहाय नियोजन यावरच यश अवलंबून आहे. अन्यथा, आजचा आशावाद उद्याच्या संकटात बदलण्यास वेळ लागणार नाही.

### शासन आणि 'युनिसेफ'मार्फत खेळ आणि संवादाच्या माध्यमातून

# विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे



**दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज**

**मुंबई :** लिंग भेद दूर करण्याबाबत राज्य शासनाच्या सहाय्याने अंगाई आणि युनिसेफतर्फे लिंग समभाव या विषयावर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रबोधनपर प्रशिक्षण दिले जात आहे. युनिसेफ आणि अंगाई यांच्या सहकार्याने देशात पहिल्यांदा धाराशीव जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या लिंग समभाव शिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण मुलींच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येत आहे. खेळाधारित शिक्षण, संवाद आणि सहभागात्मक उपक्रमांच्या माध्यमातून किशोरवयीन मुला-मुलींमध्ये समानतेची जाणीव निर्माण होत आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची जिल्हा संस्था डाएटच्या (डीआयईटी) सहकार्याने राबवण्यात आला. संपूर्ण भारतामध्ये केवळ धाराशिव जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला असून त्यामध्ये १२० शाळा, ८००हून अधिक शिक्षक आणि १८,००० हून अधिक मुलांचा सहभाग होता. धाराशिवमध्ये प्रायोगिकतत्वावर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील धाराशिवमध्ये, अंगाई-युनिसेफतर्फे लिंग समभाव हा विषय खेळाधारित शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुले-मुली, शिक्षक आणि गावातील समुदायांना शिकवण्यात आला. मीना राजू मंच हा इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला असून लिंग समभावाशी संबंधित विविध पैलूंची माहिती त्यांना करून देण्यात आली. त्यामध्ये संवाद, खेळ, चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाला स्थानिक संस्था स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता.

''मी माझ्या आईशी आणि काकूशी याबद्दल बोलले. त्यांनाही हा भेदभाव जाणवला नव्हता. त्या जुन्या परंपरेनुसार मुलींना कमी अन्नाची गरज असते, असंच मानून चालल्या होत्या. पण मी त्यांना समजावून सांगितले की आम्हा दोघांनाही समान अन्नाची गरज आहे, कारण आम्ही दोघेही समान कामं करतो,'' आर्णी गावातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या प्रज्ञा पाटोळे हिने स्वअनुभव कथन केला. शासन आणि युनिसेफ, अंगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उपक्रमामुळे मुलींना लिंग समभावाचे शिक्षण मिळाले. यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या सहायाने कुटुंबीयांच्या विचारसरणीत सकारात्मक फरक पडत आहे.

या उपक्रमामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले आहे. अनेक मुली उच्च शिक्षण घेऊ इच्छितातप्रज्ञा संवाद साधताना म्हणाली, भविष्यात डॉक्टर बनून विशेषतः महिलांच्या आरोग्य, पोषण आणि मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याची इच्छा आहे. समाजात अजूनही दुर्लक्षित असलेल्या या विषयांवर काम करण्याचा तिचा निर्धार आहे.

आज प्रज्ञा गावातील बालसभा, शाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये लिंग समभावाबाबत जागृती करते. ''बदल सोपा नाही, पण लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे,'' असे ती ठामपणे सांगते. एका सर्वसामान्य कुटुंबातून आलेली ही मुलगी आता समानता आणि न्याय्य समाजाचे स्वप्न पाहत आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी धाडसाने पुढे जात आहे. या उपक्रमामुळे समाजात स्त्री-पुरूष समानतेचे धडे बालपणी मिळत असल्याने लवकरच मोठ्या प्रमाणात बदल घडू शकेल, असा विश्वास शासन आणि संस्थांच्या माध्यमातून व्यक्त केला जात आहे.

## 'आपली बस, आपली सेवा'; एसटी महामंडळाची नवी मोहीम



**दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज**

**मुंबई :** महाराष्ट्राच्या जीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीनं, नव्या शिस्तीनं आणि नव्या संवेदनशीलतेनं प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ''आपली बस आपली सेवा'' या व्यापक मोहिमेच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवरहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासी संख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे.

**सेवेतून संस्कार, शिस्तीतून विश्वास**

चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता 'सेवक' बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे. बस सुटण्यापूर्वी चालकाने स्वत:ची ओळख करून देत प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणेहा केवळ औपचारिक भाग नसून, प्रवाशांशी नातं जोडण्याचा एक सुसंवादी प्रयत्न असेल. प्रवासादरम्यान मदतीचा हात पुढे करणारा चालक-वाहक हा एसटीचा खरा चेहरा ठरेल.

**प्रवासीही सेवेचे सहप्रवासी**

या अभियानात प्रवाशांनाही समान सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छता राखणे, मौल्यवान वस्तूंची जबाबदारी स्वत: घेणे, तसेच मोठे सामान योग्य ठिकाणी ठेवणे- या साध्या सवयी प्रवास अधिक सुखकर बनवतील. तसेच एनसीएमसी स्मार्ट कार्डचा वापर आणि ऑनलाइन आरक्षणाचा स्वीकार ही आधुनिकतेकडे टाकलेली पावले ठरतील.

**अडचणीत आधार, सेवेत सातत्य**

बस रद्द होणे किंवा मार्गात अडथळे निर्माण होणे या अनपेक्षित परिस्थितींमध्ये प्रवाशांना तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. बसस्थानके आणि परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे.

**तक्रारींवर तत्पर उपाय**

प्रवाशांच्या तक्रारींना केवळ नोंद न मानता, त्यांचे तत्काळ निराकरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. प्रत्येक स्तरावर नियमित आढावा घेत, सेवेतील उणिवा दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.

**नव्या विश्वासाचा प्रवास**

राज्यात १ मे २०२६ पासून राबविण्यात येणारी ही मोहीम केवळ सेवा सुधारण्याचा उपक्रम नसून, एसटी आणि प्रवासी यांच्यातील विश्वासाचा नवा सेतू ठरणार आहे.

## डोनाल्ड ट्रम्प यांची बुद्धी भ्रष्ट झाल्यामुळे त्यांनी जगाला नरकात ढकलण्याचे काम केले; त्यामुळे त्यांना दिवसरात्र नरकदिसत असावे

डोनाल्ड ट्रम्प यांच्या चुकीच्या कार्यशैलीमुळे जगावर आज तिसऱ्या महायुद्धाचे सावट निर्माण झाले आहे.याला कारणीभूत फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहेत आणि आता इराण युध्दात होत असलेली पीछेहाट पाहुन ट्रम्प तिलमिला झाले असून वाटेल ते वक्तव्य करतांना दिसतात.अमेरिकी रेडिओ निवेदक आणि राजकीय भाष्यकार मायकेल सॅव्हेज यांच्या भारत आणि चीनवर अश्लाघ्य भाषेत टीका करणाऱ्या व्हिडिओची डोनाल्ड ट्रम्प यांनी भलामण केली.अमेरिकेच्या जन्मसिद्ध नागरिकत्वाबाबत भाष्य करताना भारत आणि चीन सारख्या देशांचा नरकअसा आक्षेपार्ह उल्लेख यामध्ये केला आहे. ट्रम्प यांनी हा व्हिडिओ रीपोस्ट केल्यावर सर्वत्र टीकेचा सूर उमटला.त्यानंतर त्यांनी सारवासारव करत,''भारत हा महान देश असून,त्याचे प्रमुख माझे चांगले मित्र आहोत''असे अधोरेखित केले.अशाच विचलित वक्तव्याच्या कारणास्तव दुसऱ्या फेरीची शांती वार्ता निष्फळ ठरली.कारण शांती वार्तेची चर्चा सुरू असतांना डोनाल्ड ट्रम्प इराणवर फक्त धमक्यांचा वर्षाव करीत आहेत,त्यामुळे दुसऱ्या फेरीची शांती वार्ता फेल झाली आणि पुन्हा युद्धाची दाट शक्यता वाढली आहे.कारण ट्रम्प यांच्या जिभेला हाड नसल्याने अमेरिका-इराण शांती वार्ता शक्य नाही. कारण वारंवार आपले वक्तव्य बदलवुन ट्रम्प इराणची व जगाची दिशाभूल करीत आहे.यामुळेच दुसऱ्यांना नरक म्हणून संबोधणारे डोनाल्ड ट्रम्प यांच्या विषेली वक्तव्यामुळे जगावर महायुद्धाचे काळे ढग निर्माण झाले आणि आता भारत-



चीनची तुलना नरकअशी करतात म्हणून त्यांच्या कोणत्याही शब्दावर कोणीही विश्वास ठेवण्यास तयार नाही त्याचा परिणाम म्हणून युद्ध पुन्हा भडकु शकते. दिनांक २८ फेब्रुवारीला अमेरिकेने इराणवर अचानक हल्ला करून जगाला महायुध्दाच्या खाईत लोटुन जगाला आर्थिक आणि मानवीय अडचणीत टाकले व जगाला सामंजस्यमध्ये आणले आणि आता शांती वार्ता सुरू असतांना सुध्दा वेळोवेळी इराणला धमकी देण्याचे काम करीत आहेत.त्यामुळे एकाच वेळेस दोन गोष्टी होवू शकत नाही. एकतर शांती वार्ता किंवा युद्ध हाच पर्याय आहे.अशा परिस्थितीत इराण शांतीवार्ताच्या दुसऱ्या फेरीतून बाहेर पडला आहे.यामुळे इराण-अमेरिका-इजरायल युद्ध केंव्हाही कधीही भडकू शकते याला नाकारता येत नाही. या युध्दाची मुख्य जड डोनाल्ड ट्रम्प आहे.कारण डोनाल्ड ट्रम्प मिडिया समोर येऊन केव्हा काय बोलतील याचा कोणालाच भरोसा रहाला नाही. आज अमेरिकन जनतेसह संपूर्ण जग डोनाल्ड ट्रम्पला विश्व शांतीचा हत्यारा समजत आहे.अमेरिकेने नेहमीच अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पळ काढला ही बाब जगातील अनेक देशांना चांगल्याप्रकारे ग्यात आहे आणि त्याचीच पुनरावृत्ती पश्चिम आशियातील ( मिडलिस्ट) देशांची करून ठेवली आहे. त्याचप्रमाणे डोनाल्ड ट्रम्प आपली करारी हार लक्षात घेता, मिडलिस्टला रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पसार होण्याच्या तयारीत होते.परंतु त्यांना तोंड लपवायला जागा नसल्याने पुन्हा युद्धाच्या तयारी लागले आहेत. आज जे पश्चिम आशियात भितीचे वातावरण आणि मृत्यू तांडव निर्माण झाले आहे याला कारणीभूत फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहे असे मला वाटते.कारण त्यांच्या छोट्याशा चुकीच्या निर्णयामुळे व वक्तव्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत गेली आणि याचे रूपांतर युद्धात झाले.यावरून स्पष्ट होते की, डोनाल्ड ट्रम्प यांचे मानसिक संतुलन ढासळले असुन त्यांच्यावर कोणीही विश्वास ठेवण्यास तयार नाही.

इराण- अमेरिका-इजरायल यांच्या युद्धापासुन,नाटो देश, भारत, चीन, रशिया दुरू असतांना सुध्दा अमेरिकेने नाटो देशांना खडे बोल सुनावले आणि आता डोनाल्ड ट्रम्प भारत-चीनला (हेलहोल) ''नरक'' म्हणून संबोधतात ही तर भारताच्या बाबतीत डोनाल्ड ट्रम्प यांनी संपूर्ण हद पार केल्याचे लक्षणच म्हणावे लागेल. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांच्या वागण्यावरून व बोलण्यावरून स्पष्ट होते की,त्यांचे मानसिक संतुलन ढासळले आहेत यामुळे त्यांच्या जीभेला हाड रहाले नाही.डोनाल्ड ट्रम्प आधी भारताला नरक म्हणून संबोधतात आणि आता सारवासारव करून भारताला ''महान देश'' म्हणून उल्लेख करतात यावरून स्पष्ट होते की गेल्या ५७ दिवसात त्यांनी जगाला विचलित करणारे वक्तव्य केले असून हे सर्व मुर्खपणाचे लक्षण आहे.एकीकडे अमेरिका शांतीवार्ताची पहल करीत आहे तर दुसरीकडे अमेरिकेने संपूर्ण पश्चिम आशियात आपले सैन्य जाळे विणुन इराणची नाकाबंदी करण्यास सुरुवात केली आहे. पश्चिम आशियात आपली सैन्य ताकद मजबूत करण्यासाठी तिसरी अण्वस्त्रसज्ज विमानवाहू नौका '' यूएसएस जॉर्ज एचडब्ल्यू बुश''(सीव्हीएन-७७) आता इराणच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. लाल समुद्रातील धोकादायक मार्ग टाळून ही युद्धनौका आफ्रिकेचे दक्षिण टोक म्हणजेच केप ऑफ गुड होपला वळसा घालून पश्चिम आशियात तैनात केली आहे.हे अमेरिकन नौदलाचे ''निमित्झ क्लास''मधील १० वे आणि शेवटचे सुपर कॅरियर आहे.यावरून स्पष्ट होते की,एकिकडे सैन्य तैनाती आणि दुसरीकडे शांती वार्ता या दोन्हीही गोष्टी एकाच वेळी शक्य नाही.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचे तत्व जगाला पटणारे दिसत नाही.आज जगात ज्या सामुद्रधुनी मधुन २५ टक्के तेल वाहू जहाजांचे आवागमन होते तीथे निर्माण झालेल्या कोंडीचा सुत्रधार डोनाल्ड ट्रम्पच आहे. त्यमुळे आज अनेक देशांचे हजारो जहाज होर्मुझच्या आसपास अडकले आहेत. ट्रम्पने जर युद्ध छेडले नसते तर आज होर्मुझ सर्वांसाठी खुला रहाला असता.परंतु अमेरिकेच्या अरेरावीमुळे इराणने होर्मुझवर आपली पकड मजबूत केली आहे आणि त्याचा परिणाम आज जगातील अनेक देशांना भोगावा लागतो आहे आणि याला जबाबदार फक्त डोनाल्ड ट्रम्पच आहेत. अनिश्चित काळासाठी युद्ध विराम झाला आहे आणि शांती वार्ता बंद -सुरू अशा व्दीधा परिस्थितीत आहे, तरी ट्रम्प यांचा धमक्यांचा वर्षाव थांबलेला नाही. ट्रम्प यांनी नौदलाला आदेश दिला आहे की, होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या इराणच्या छोट्या नौका दिसताच त्याला गोळ्या घालून नष्ट करा असा आदेश अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आपल्या नौदलाला दिला आहे. अशाप्रकारे ट्रम्प या युध्दाला चिघळविण्याचे काम करीत आहेत. कारण अमेरिकेने जर युध्दाला सुरुवात केली तर, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी इराण सज्ज आहे असे इराणच्या सुत्रांनी सांगितले.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ऍक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

## Short न्यूज

### देऊळगाव राजा येथे किरकोळ वादातून मारहाणीचा गुन्हा दाखल

**देऊळगाव राजा :** शहरातील जालना रोड परिसरात किरकोळ वादातून मारहाणीची घटना घडल्याप्रकरणी पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, अप क्रमांक १९१/२०२६ अन्वये भा. न्याय संहिता २०२३ मधील कलम ११८(१), २९६, ३५२, ३५१(२), ३५१(३) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात फिर्यादी योगेश मानिकराव खराट (वय २९, रा. जुना जालना रोड, देऊळगाव राजा) यांनी तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे १०:३० वाजताच्या सुमारास जालना रोडवरील हॉटेल अन्नपूर्णा येथे आरोपी प्रज्वल डिघोळे रा. साईनगर, देऊळगाव राजा याच्याशी जुना आर्थिक वाद उफाळून आला. यावेळी आरोपीने फिर्यादीस अश्लील शिवीगाळ करून हाताने मारहाण केली तसेच जवळील लाकडी काठीने पाठीत मारहाण केल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. ही घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी दि. २५ एप्रिल उशिरा रात्री फिर्यादीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. संबंधित गुन्हा पोलीस कर्मचारी सुषमा उईके यांनी दाखल केला असून पुढील तपास पोलीस कर्मचारी संजय गोरे करीत आहेत.

### स्पर्श प्रणालीमुळे घरकुलधारकांना अडचणी; निधी तातडीने वितरित करा - शैलेश सावजी यांचे केंद्रीय मंत्र्यांना निवेदन

**डोणगाव :** स्पर्श प्रणालीमुळे बुलढाणा जिल्ह्यासह महाराष्ट्रातील घरकुल लाभार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्याचा आरोप करत, प्रलंबित निधी तातडीने वितरित करण्याची मागणी काँग्रेसचे बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सपना सुबोधभाऊ सावजी यांनी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात सावजी यांनी म्हटले आहे की, स्पर्श प्रणालीमुळे घरकुल योजनेंतर्गत निधी वितरणात विलंब होत असून अनेक लाभार्थ्यांची घरे अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे गरीब व गरजू कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. बुलढाणा जिल्हा हा घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांच्या संख्येने राज्यातील महत्त्वाच्या जिल्ह्यांपैकी एक असून, निधीअभावी अनेक कुटुंबांची घरे रखडल्याचे त्यांनी नमूद केले आहे. बांधकामासाठी घेतलेले कर्ज, वाढलेले साहित्य दर आणि थकीत हप्ते यामुळे लाभार्थी गंभीर अडचणीत सापडले असल्याचेही त्यांनी सांगितले. स्पर्श प्रणाली तातडीने सुरळीत सुरू करून प्रलंबित निधी वितरित करावा. तसेच नवीन प्रणाली सुरू होण्यास विलंब होत असल्यास जुन्या प्रणालीद्वारे घरकुलधारकांना निधी देण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी निवेदनातून केली आहे. या प्रश्नात केंद्र शासनाने तातडीने हस्तक्षेप करून बुलढाणा जिल्ह्यातील लाखो घरकुल लाभार्थ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही सावजी यांनी व्यक्त केली आहे.

### देऊळगाव राजा बसस्थानक चौकात अपघात; दुचाकीस्वार जखमी




**देऊळगाव राजा :** शहरातील बसस्थानक चौकात भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला असून याप्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोहम्मद नासीर अब्दुल रजाक (वय ४२, व्यवसाय मसाला एजन्सी, रा. दमडी महल परिसर, देऊळगाव राजा) यांनी तक्रार दाखल केली आहे.दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास बसस्थानक चौकात टाटा पंच (क्र. २८ ९८२१) या वाहनाच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवून फिर्यादी यांच्या भावाच्या ताब्यातील मोटारसायकल (क्र. ०४ ४५०८) ला धडक दिली. या धडकेत फिर्यादी यांचे भाऊ मोटारसायकलवरून खाली पडले. त्यांना डोक्याला व तोंडाला दुखापत झाली असून उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातास संबंधित चारचाकी वाहन चालक जबाबदार असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात अप क्रमांक १८९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २८१, १२५(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेका सय्यद मुसा करीत आहेत.

# लोणारमध्ये 'खगोल दर्शन महोत्सव २०२६'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## हजारो नागरिकांनी घेतला दुर्बिणीतून ग्रह-ताऱ्यांचा अद्भुत अनुभव

**दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज**

**लोणार :** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आणि आंतरराष्ट्रीय 'डार्क स्काय वीक'च्या पार्श्वभूमीवर लोणार येथे आयोजित 'खगोल दर्शन महोत्सव २०२६' ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. २४ ते २६ एप्रिल दरम्यान आयोजित या महोत्सवात पहिल्याच दोन दिवसांत ९०० ते ११०० नागरिकांनी सहभाग नोंदवत आकाश निरीक्षणाचा अनोखा अनुभव घेतला.

**पहिल्याच दिवशी शेकडो नागरिकांचा सहभाग**

महोत्सवाच्या उद्घाटन दिवशी (२४ एप्रिल) सुमारे ३०० ते ४०० नागरिकांनी, तर दुसऱ्या दिवशी (२५ एप्रिल) ६०० ते ७०० नागरिकांनी सहभाग घेतला. यावेळी नागरिकांनी सूर्य, चंद्र, गुरु आणि शुक्र या ग्रहांचे दुर्बिणीतून दर्शन घेतले. आकाशात ढग असल्यामुळे निरीक्षणासाठी काही वेळ प्रतीक्षा करावी लागली, तरीही उपस्थितांनी संयमाने अनुभव घेतला.

**देशभरातून पर्यटकांची उपस्थिती**

या महोत्सवासाठी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर तसेच बुलढाणा जिल्ह्यातील विविध भागांतून नागरिक लोणार येथे



दाखल झाले. जगप्रसिद्ध उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर 'डार्क स्काय'



संवर्धनासाठी अत्यंत अनुकूल ठिकाण ठरत असल्याने या ठिकाणाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले.

**विज्ञान, पर्यावरण आणि पर्यटन यांची सांगड**

महोत्सवात स्टारगेझिंग (आकाश निरीक्षण), तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रदर्शने व माहितीपट यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रकाश प्रदूषणाचे दुष्परिणाम, नैसर्गिक अंधाराचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धन याविषयी नागरिकांना सविस्तर माहिती दिली जात आहे. ''लोणार परिसरात प्रकाश प्रदूषण कमी ठेवले, तर वैज्ञानिक संशोधनास चालना मिळेल आणि पर्यावरण संतुलन राखण्यास मोठी मदत होईल.''

**संयुक्त उपक्रमातून खगोल पर्यटनाला चालना**

हा महोत्सव एमटीडीसी, ॲस्ट्रॉनइरा आणि डार्क स्काय इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. ॲस्ट्रॉनइराच्या संस्थापिका श्वेता कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून स्टारगेझिंग सत्रांचे आयोजन करण्यात आले.

**शाश्वत पर्यटनाला नवी दिशा**

लोणार येथे पर्यटनविकासासाठी पर्यटक निवास, अभ्यागत केंद्र, तारांगण, प्रयोगशाळा, योग केंद्र यांसारख्या सुविधा विकसित केल्या जात आहेत. हा उपक्रम 'ॲस्ट्रोटुरिझम' या नव्या पर्यटन क्षेत्राला चालना देत असून लोणारच्या शाश्वत विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

**खगोल दर्शन म्हणजे काय?**

खगोल दर्शन म्हणजे उघड्या डोळ्यांनी किंवा दुर्बिणीद्वारे तारे, ग्रह, नक्षत्र आणि आकाशगंगा यांचे निरीक्षण करणे. हे केवळ विज्ञान नसून एक रोमांचक आणि ज्ञानवर्धक छंद आहे.

**२ दिवसांत १००० च्या आसपास नागरिकांचा सहभाग**

गुरु, शुक्र, सूर्य व चंद्राचे दुर्बिणीतून दर्शन
'डार्क स्काय' संवर्धनाचा संदेश
देशभरातून पर्यटकांची उपस्थिती
पर्यावरणपूरक 'ॲस्ट्रोटुरिझम'ला चालना

लोणारचा 'खगोल दर्शन महोत्सव २०२६' हा केवळ आकाश निरीक्षणाचा कार्यक्रम नसून विज्ञान, पर्यावरण आणि पर्यटन यांची सांगड घालणारा अनोखा उपक्रम ठरत आहे. भविष्यात लोणारला जागतिक स्तरावर 'डार्क स्काय डेस्टिनेशन' म्हणून ओळख मिळण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे.

# देऊळगाव राजा : ट्रॅव्हल्समधून गांजा वाहतूक करणारा अल्पवयीन ताब्यात



**दैनिक निशस्त्र योध्दा**

**देऊळगाव राजा :** धरणकमान टाकरखेड शिवार परिसरात पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत सुमारे १ लाख ११ हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथील पथकाला दिनांक २४ एप्रिल रोजी गुप्त बातमी मिळाली की, अकोला येथील शेख फरदिन शेख हुसेन (वय १८ वर्षे) हा गांजा विक्रीसाठी ट्रॅव्हल्समधून घेऊन जात आहे. संबंधित ट्रॅव्हल्स धरणकमान येथील खाडे यांच्या श्री गजानन हॉटेलसमोर थांबलेली असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन तत्काळ सापळा रचला. पंचांसमक्ष तपासणी केली असता एका अल्पवयीन मुलाच्या बॅगेतून ५ किलो ५० ग्रॅम गांजा, किंमत अंदाजे १,०१,००० रुपये तसेच संपर्कासाठी वापरलेला मोबाईल (किंमत १०,००० रुपये) असा एकूण १,११,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस स्टेशन देऊळगाव राजा येथे एनडीपीएस ॲक्ट कलम २०()() अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक ब्रम्हा गिरी यांच्या नेतृत्वाखाली, पोउपनि राजकुमार मोहोळकर व त्यांच्या पथकाने, तसेच फॉरेन्सिक टीम व नायब तहसिलदार डॉ. संतोष मुंढे यांच्या उपस्थितीत पार पडली. पुढील तपास पोलीस निरीक्षक ब्रम्हा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# प्रकल्पग्रस्तांच्या डोळ्यात धूळफेक?

## जिगाव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याचा आत्मदहन, उपोषणाचा इशारा !

**दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज**

**जळगाव जामोद :** सरकारच्या मोठ्या प्रकल्पांसाठी आपल्या सुपीक जमिनी देणाऱ्या बळीराजावर प्रशासनाकडून अन्याय होत असल्याचे संतापजनक वास्तव समोर आले आहे. जळगाव जामोद तालुक्यातील गोळेगाव बुद्रुक येथील जिगाव प्रकल्पग्रस्त शेतकरी हरिश्चंद्र रूपचंद हुरसाळ यांनी प्रशासकीय दिरंगाई आणि भ्रष्ट कारभाराला कंटाळून जिल्हाधिकारी कार्यालयासमोरआमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

जिगाव प्रकल्पांतर्गत भूसंपादनासाठी डिसेंबर २०२४ मध्ये संयुक्त मोजणी करण्यात आली होती. मात्र, मोजणी अहवाल प्रसिद्ध झाल्यावर धक्कादायक बाब समोर आली. गट नंबर ७७ मधील शेतकरी हरिश्चंद्र हुरसाळ यांच्या शेतातील बांधकामाची नोंद या अहवालात जाणूनबुजून वगळण्यात आल्याचा आरोप शेतकऱ्याने केला आहे. याबाबत त्यांनी वेळोवेळी उपविभागीय अधिकारी आणि भूसंपादन कार्यालयाकडे लेखी तक्रारी केल्या, मात्र प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळाली.

प्रशासनाचा अर्थपूर्ण खेळ?

या तक्रारीची दखल घेऊन १ ऑक्टोबर २०२५ रोजी गोटगाव खुर्द येथे कनिष्ठ अभियंता आणि भूमी अभिलेख कार्यालयाने विशेष कॅम्पचे आयोजन केले होते. या कॅम्पमध्ये शेतकऱ्यांच्या पुराव्यांची पडताळणी झाली. धक्कादायक म्हणजे, इतर शेतकऱ्यांच्या (गट नं. ६७, ६८, ७४) बांधकामांच्या नोंदी घेण्यात आल्या, परंतु गट नंबर ७७ मधील हरिश्चंद्र हुरसाळ यांचे बांधकाम पुन्हा एकदा डावलण्यात आले.

''माझे बांधकाम अधिकृत असतानाही आणि सर्व पुरावे देऊनही केवळ मलाच का डावलले जात आहे? शासकीय अधिकारी कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत?'' असा संतप्त सवाल हरिश्चंद्र हुरसाळ यांनी उपस्थित केला आहे.गेल्या ६ महिन्यांपासून हा गरीब शेतकरी जिगाव प्रकल्प कार्यालय आणि तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहे. तुमचे काम करू असे म्हणून त्यांना दरवेळी रिकाम्या हाती परत पाठवले जात आहे.

प्रशासनाच्या या अडेलतट्टू धोरणामुळे संपूर्ण हुरसाळ कुटुंब हतबल झाले आहे.वारंवार विनंती करूनही न्याय मिळत नसल्याने, हरिश्चंद्र हुरसाळ यांनी आता टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवले आहे. येत्या १ मे २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा समोर त्यांनी आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. जर यादरम्यान काही अघटित घडल्यास त्यास पूर्णतः शासन आणि प्रशासन जबाबदार असेल, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.आता या प्रकल्पग्रस्ताला न्याय मिळतो की प्रशासन आपल्या भूमिकेवर ठाम राहते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# ४४ तापमानात टीनपत्र्याच्या खोलीत शिष्यवृत्ती परीक्षा; मलकापूरात शिवसेना (उबाठा) सह पालक संतप्त

## शिवसेना उपजिल्हाप्रमुख (उबाठा) गजानन ठोसर यांनी शिक्षणाधिकारी फाळके यांची केली कान उघाडणी

**दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज**

**मलकापुर:** तालुक्यात गेल्या ४-५ दिवसांपासून प्रचंड उष्णतेची लाट सुरू असताना मलकापूर येथील चौथीच्या विद्यार्थ्यांची शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा तब्बल ४४ अंश तापमानात गोविंद विष्णू महाजन विद्यालयात घेण्यात आली. भर दुपारी लहान विद्यार्थ्यांना टीनपत्र्याच्या खोलीत बसवण्यात आल्याने पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला.

याबाबतची माहिती पालकांनी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, शहरप्रमुख हरीदास गणबास यांना दिली,अत्यंत उष्ण हवामानात विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व सोयीस्कर , पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे अपेक्षित असताना प्रशासनाकडून योग्य नियोजन न झाल्याचे दिसून आले. इतर जिल्ह्यात उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ होत असतानाही शिक्षण विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करीत शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी शिक्षणाधिकारी फाळके यांची भ्रमणध्वनीद्वारे कान उघाडणी केल्याने फाळके यांनी तात्काळ परीक्षा केंद्रावर धाव घेतली यावेळी उपस्थित पालकांनी शिक्षणिधिकारी फाळके यांच्या अनागोंदी कारभारा विषयी रोष व्यक्त केला आहे.

या प्रकारामुळे शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी केली आहे.

## उष्णतेच्या लाटेत विद्यार्थ्यांशी निष्काळजीपणा; शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह...



# मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील घाटाला मिळणार बायपास; 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे १ मेला उद्घाटन

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली मिसिंग लिंकचा कामाची पाहणी
- घाटातील अपघात आणि विलंबाला कायमचा ब्रेक; वेगवान आणि सुरक्षित प्रवासाने अर्थव्यवस्थेला मिळणार गती
- नवीन टोलवाढ नाही, चारचाकी आणि बसेस मधून होणाऱ्या प्रवासी वाहतुकीला परवानगी

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज





**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ॲक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. ''मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत,'' असे त्यांनी सांगितले.

सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. ''या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील,'' असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल.

टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, ''मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही.''

सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा देशातील पहिला ॲक्सेस कंट्रोल मार्ग ठरला होता. या मार्गामुळे आयटी, सेवा क्षेत्र, उद्योग आणि रिअल इस्टेटमध्ये मोठी वाढ झाली. आता मिसिंग लिंक प्रकल्पामुळे या मार्गाची कार्यक्षमता आणखी वाढणार आहे.

तसेच या प्रकल्पामुळे लोहगड, विसापूर किल्ले आणि कार्ला लेणी यांसारख्या पर्यटन स्थळांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार असून पर्यटनालाही चालना मिळेल. यासाठीच या प्रकल्पातील बोगद्यांना देखील गडकिल्ले आणि कार्ला लेण्याच्या प्रतीकृतीप्रमाणे सजवण्यात आले असल्याचे शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. कामाचा दर्जा उत्तम ठेवून ही शिल्प खराब होऊ नयेत याची पुरेशी खबरदारी घेण्यात आली असल्याचे यावेळी शिंदे यांनी स्पष्ट केले.

''अशा प्रकारचे प्रकल्प हे केवळ रस्ते नसून राज्याच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे असतात. कनेक्टिव्हिटी मजबूत असेल तर उद्योग, आयटी, सेवा क्षेत्र आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतात,'' असे शिंदे यांनी सांगितले.

पुढील काळात समृद्धी महामार्ग, कोकण कोस्टल रोड, वसई-विरार मल्टीमोडल कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांना जोडून राज्यात ॲक्सेस कंट्रोल रस्त्यांचे जाळे उभारण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ''महाराष्ट्रातील कोणत्याही कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात ७ ते ८ तासांत पोहोचता येईल, अशी सक्षम दळणवळण व्यवस्था उभारत आहोत,'' असे त्यांनी सांगितले.

मिसिंग लिंक प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार असून हा प्रकल्प राज्याच्या विकासाला गती देणारा ठरणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, माजी नगरसेवक आबासाहेब बागुल, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि एमएसआरडीसी, एफ्कॉन आणि नवयुग कंपनीचे सर्व प्रमुख अभियंते आणि कर्मचारी उपस्थित होते.

## सूर्याचा प्रकोप कमी होणार! पुढचे काही दिवस उष्णतेपासून मिळणार दिलासा, हवामान विभागाकडून महत्वाची माहिती

**मुंबई :** राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. आज राज्यात अकोल्यात विक्रमी तापमानाची म्हणजदे ४६.९ अंश तापमानाची नोंद झाली आहे. विदर्भात उष्णतेची लाट आली आहे. वाढत्या तापमानाचा लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, अशातच हवामान विभागाकडून एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्राला उष्णतेपासून पुढील काही दिवसांत दिलासा मिळणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. २७ एप्रिलपासून महाराष्ट्रात तापमानात हळूहळू २ ते ३ अंश तापमानाची घट होण्याची शक्यता असून १ मे पर्यत हा उतार कायम राहणार आहे.

किनारपट्टीच्या भागात उष्ण व दमट हवामानाचा इशारा कायम देण्यात आला आहे. विदर्भात आज (२६ एप्रिल) उष्णतेच्या लाटेच्या परिस्थितीचा इशारा देण्यात आला होता. देशात काल सर्वाधिक तापमान उत्तर प्रदेशातील बांदा येथे ४७.४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. महाराष्ट्रात कमाल तापमान सर्वसाधारणपणे सामान्यापेक्षा १.६ ते ३ अंशांनी अधिक आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भ या सर्व विभागांत हीच स्थिती आहे. कोकण व गोव्यात आज (२६ एप्रिल) विखुरलेल्या ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस व वीज-गडगडाटासह वादळी वारे (३० ते ५० किमीतास) शक्य आहेत. मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातही आज तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. परभणीत ३७ वर्षीय शिवाजी बबन कांबळे यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. दिवसभर उन्हात फिरल्यानंतर त्यांना चक्कर आली आणि त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. जळगाव शहरात तापमान ४३ अंशांच्या पुढे गेल्याने महानगरपालिकेने शहरातील प्रमुख चौकांमध्ये टँकरद्वारे पाणी मारण्याची मोहीम राबवली आहे.

## धीरेंद्र शास्त्रींच्या वादग्रस्त वक्तव्याने संताप: शिवप्रेमींचा ठिकठिकाणी निषेध, कठोर कारवाईची मागणी; पोलिसांत तक्रार

**गोंदिया :** नागपूर येथे झालेल्या एका धार्मिक कार्यक्रमातील कथावाचक धीरेंद्र शास्त्री यांच्या वक्तव्यामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असून रविवारी गोंदिया शहरात शिवप्रेमी रस्त्यावर उतरले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी कथितपणे अवमानकारक विधान केल्याच्या निषेधार्थ विविध संघटनांनी आंदोलन छेडले आहे.

शहरातील मनोहर चौक येथे छत्रपतींच्या प्रतिमेसमोर जमलेल्या शिवप्रेमींनी संतप्त भावना व्यक्त करत धीरेंद्र शास्त्री यांच्या छायाचित्राला जोडे मारून निषेध नोंदविला. या आंदोलनात संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, ओबीसी संघर्ष कृती समिती, कुणबी समाज तसेच विविध सामाजिक संघटनांचा मोठा सहभाग होता. वातावरणात घोषणांचा कडकडाट आणि भावनांचा ज्वार एकत्र मिसळून एक प्रकारची अस्वस्थता जाणवत होती.

वादाचा गाभा ठरलेले वक्तव्य असे की, शास्त्री यांनी कथितपणे असे म्हटले की, शिवाजी महाराजांनी आपण थकलो असल्याचे सांगत स्वराज्य आणि मुकुट रामदास स्वामी यांच्या चरणी अर्पण केला होता. या विधानामुळे इतिहासाचे विकृतीकरण केल्याचा आरोप होत आहे. शिवप्रेमींचे म्हणणे आहे की, छत्रपती शिवाजी महाराज आणि रामदास स्वामी यांच्यातील संबंधाबाबत अशी मांडणी ऐतिहासिकदृष्ट्या आधारहीन असून यामागे विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न दिसून येतो. छत्रपतींच्या कार्याचा गौरव करताना आंदोलनकर्त्यांनी त्यांच्या स्वराज्याच्या संकल्पनेची उजळणी केली. जाती-पातीच्या पलीकडे जाऊन सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी उभे राहणारे, शौर्य, न्याय आणि समतेचे प्रतीक असलेले शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहेत, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. दरम्यान, या प्रकरणाचे राजकीय पडसादही उमटताना दिसत आहेत. नागपूर येथील कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मोहन भागवत उपस्थित होते, यामुळे या वक्तव्याची तीव्रता अधिकच वाढल्याचे बोलले जात आहे.

## कांदा बियाणेच 'जीवदान'! विदर्भातील शेतकऱ्यांचा एकमेव आधार डळमळीत

दैनिक निशस्त्र योध्दा

**देऊळगाव राजा :** अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि घसरलेले बाजारभाव या तिहेरी संकटाने विदर्भातील शेतकरी अक्षरशः कोंडीत सापडला आहे. सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन दरही न मिळाल्याने शेतकरी तोट्यात गेला. कपाशी आणि तुर यांसारख्या पारंपरिक पिकांनीही अपेक्षित उत्पन्न दिले नाही. उलट हमीभावापेक्षा कमी दराने माल विकण्याची वेळ आल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

अशा निराशाजनक पार्श्वभूमीवर विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागातील शेतकऱ्यांसाठी कांदा बियाणे उत्पादन हेच एकमेव आशेचे किरण ठरले होते. दरवर्षी सुमारे ४०० ते ५०० कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या या व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात शेतकरी वळले होते. बियाण्याला तुलनेने हमीभाव मिळत असल्याने हा पर्याय स्थिर उत्पन्नाचा आधार मानला जात होता.



मात्र, यंदा निसर्गाने इथेही घाला घातला. लागवडीपासूनच अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे कांदा बियाणे पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार उत्पादनात तब्बल २० ते २५ टक्क्यांनी घट होण्याची शक्यता आहे.

यामुळे बाजारात बियाण्याचे दर वाढण्याची चिन्हे दिसत असली, तरी प्रत्यक्षात काही कंपन्यांकडून ५० ते ६० हजार रुपये प्रति क्विंटल दर देण्याची चर्चा सुरू आहे. मागील काही वर्षांपासून ५० ते ६० हजार दर स्थिर होते, पण वाढलेले खत, औषधे आणि मजुरी खर्च लक्षात घेता हा दर परवडणारा नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, काही नामांकित कंपन्यांनी आधीच ७० हजार रुपये प्रति क्विंटल दराने करार केले आहेत. त्यामुळे सर्व कंपन्यांनी किमान ७० हजार रुपये हमीभाव द्यावा, अशी एकमुखी मागणी शेतकरी करत आहेत. शेतकरी संघटनांकडूनही इशारा देण्यात आला आहे की, हमीभावाची स्पष्ट खात्री करूनच बियाणे कंपन्यांकडे माल द्यावा, अन्यथा शेतकऱ्यांचे पुन्हा आर्थिक नुकसान होऊ शकते. निसर्गाचा मार आणि बाजारातील अनिश्चितता यामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी कांदा बियाणे हा 'आधार' ठरत असला, तरी तोही आता धोक्यात येत असल्याने शेतकऱ्यांच्या चिंता अधिकच वाढल्या आहेत.

## साखरखेर्डा परिसरातील भाविक हजयात्रेला रवाना

दैनिक निशस्त्र योध्दा न्यूज

**साखरखेर्डा/असलम अंजुम :**

इस्लाम धर्मात हजयात्रा करण्याला एक विशेष महत्व प्राप्त आहे. अगदी सामान्यताला - सामान्य माणूसही हजला मक्का - मदीना येथे जाण्यासाठी अगदी शेवटच्या श्वासापर्यंत आपल्याला एकदा तरी हजयात्रा नशिब व्हावी म्हणून आल्लाहकडे प्रार्थना करीत असतो.



यावर्षीसुद्धा भारतातून लाखो भाविक हजयात्रेसाठी मक्का - मदीना या पवित्रस्थानी जात असून साखरखेर्डा येथून ग्रामपंचायतचे माजी सदस्य आरीफ खान व त्यांच्या पत्नी, शेख युनूस तांबोळी, सेवानिवृत्त एसटी वाहक लतीफ खान यांचा हजयात्रेला जाण्यासाठी नंबर लागला आहे. तर दुसरीकडे शेख जुबेर शेख हमजा मौलाना यांचीही हजयात्रेकरुंच्या सेवेसाठी (खिदमतगार) निवड झाली आहे. या सर्वांना त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक आणि समाजबांधवांनी उत्साही तेव्हढ्याच जड अंतःकरणाने निरोप दिला. या पाचही भाविकांची हजयात्रा सुखदायी होण्यासाठी दुआ करण्यात आली. तसेच या देशातच नव्हे तर अख्ख्या जगात प्रेम, माणुसकी, बंधूभाव आणि शांतता नांदावी यासाठी या हजयात्रींनी मक्का - मदीना येथे अल्लाहपुढे नतमस्तक होऊन दुआ करण्याची विनंतीही करण्यात आली.

